महाराष्ट्र वन विभाग

महाराष्ट्र शासन
वनविभाग
उप वनसंरक्षक, शहापुर वनविभाग, शहापुर यांचे कार्यालय
शहापुर आसनगांव जुना आग्रा रोड४२१६०१ ,शहापुर.ता.पो.मु ,
दुरध्वनी क्र.- ०२५२७- २७२०९६
ईमेल आयडी-dycfshahapur@mahaforest.gov.in/dcfshahapur@gmail.com

क्रमांक - कक्ष-10/FCA/ 4365 /2025-26 दिनांक 30 / 03 / 2026

प्रति,

मे. जेएसडब्ल्यु एनर्जी पीएसपी टु लि.,
जेएसडब्ल्यु सेंटर, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व) मुंबई - 400 051.

विषय:- वनजमिन- ठाणे व नाशिक
मे. जेएसडब्ल्यु एनर्जी पीएसपी टु लि., मुंबई यांनी भावली पंप स्टोरेज प्रोजेक्टचे बांधकाम करण्यासाठी ठाणे व नाशिक जिल्हयातील 243.74 हे. वनजमिन वळतीकरणाबाबत.

संदर्भ:-
1. मे. जेएसडब्ल्यु एनर्जी पीएसपी टु लि., मुंबई यांचेकडील पत्र क्र. JSWNEL/BHAVALI/FC/--- 2023-24, दिनांक 6/03/2022
2. केंद्र शासन, दिल्ली यांचेकडील दि.17.03.2026 रोजीचे पत्र.
3. मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-10/FCA/A-20/CR-80/24-25428/25-26, दि. 20/03/2026.
4. या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-10/FCA/4284/25-26, दि.24.03.2026
5. आपलेकडील दि.25/03/2026 रोजीचा पुर्तता अहवाल.
6. उपवनसंरक्षक, नाशिक पश्चिम यांचेकडील पत्र क्र.कक्ष -3/जमीन/2753/2025-26, दि.25.03.2026

विषयांकित प्रकरणी मे. जेएसडब्ल्यु एनर्जी पीएसपी टु लि., मुंबई यांनी 1500 MW भावली पंप स्टोरेज प्रोजेक्ट (PSP) करीता आवश्यक असलेल्या ठाणे जिल्हयातील शहापूर वनविभागाचे कार्यक्षेत्रातील मौजे कळभोंडे व मौजे कोथळे, ता. शहापूर येथील एकुण 181.45 हे.आर व नाशिक जिल्हयातील नाशिक पश्चिम वनविभागाचे कार्यक्षेत्रातील मौजे जामुंडे, ता. इगतपूरी येथील एकुण 94.3 हे.आर असे एकुण एकंदर 275.75 पैकी 243.74 हे.आर वनजमीनीचे वळतीकरणास केंद्र शासनाची मंजूरी मिळणेकामी वन (संवर्धन) अधिनियम, 1980 चे कलम 2 अंतर्गत सुधारीत प्रस्ताव ऑनलाईन www.forest clearance.In वर सादर केलेला असून सदर प्रस्तावाचा सांकेतांक क्रमांक FP/MH/HYD/153240/2022 असा आहे. सदर प्रस्तावाची हार्ड कॉपी या कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी सादर केलेली होती.

त्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव तत्वत: मंजुरीसाठी सादर करण्यांत आलेला होता. केंद्र सरकरकडून वेळोवेळी काढण्यांत आलेल्या त्रुटींची पुर्तता करुन सदर प्रस्ताव मंजुरीकामी सादर करण्यांत आलेला होता.

तथापि केंद्र शासनाकडून सदर प्रस्तावामध्ये दि.17.03.2026 रोजी खालीलप्रमाणे 2 त्रुटी उपस्थित करण्यांत आलेल्या आहेत. सदर त्रुटींची पुर्तता करणेकामी संदर्भ क्र.03 अन्वये मुख्य वनसंरक्षक, ठाणे (प्रा.) यांनी पुढील कार्यावाहीसाठी या कार्यालयास सुचित केले आहे. त्या अनुषंगाने पुर्तता अहवाल सादर करणेकामी संदर्भ क्र.04 अन्वये आपणांस कळविण्यांत आले आहे.

प्रकरणी प्रस्तावात दि.17.03.2026 रोजीचे त्रुटी पत्रातील अट क्र. 1 व 2 साठी वनेतर जमीन प्रस्तावित करणेबाबत सुचविले असून आपण प्रस्तावित क्षेत्राचे जवळपास वनेत्तर जमीन उपलब्ध नसलेबाबत, तसेच सदरची प्रत्सावित जमीन प्रस्तुत कामासाठी योग्यच असून जवळ आहे. त्यामुळे सदरचे बाधित क्षेत्र कमी करुन नव्याने क्षेत्र पस्तावित करत असलेबाबत संदर्भ क्र.05 अन्वये प्राप्त झालेल्या पुर्तता अहवाल नमूद केले आहे व कमी करण्यांत आलेल्या क्षेत्राबाबचे दस्ताऐवत अंतिम मंजूरी पत्रातील अटींचे पुर्तता अहवाला सोबत जोडून देण्यांत येणार असलेबाबतचे हमीपत्राने कळविण्यांत आलेले आहे .

तथापि आपणांमार्फत नव्याने प्रस्तावित करण्यांत आलेल्या क्षेत्राची KML व नकाशे सोबत जोडले नसल्याने प्रस्तावित केलेले क्षेत्राची पाहणी करणे शक्य होत नाही.

तरी आपणांस सुचित करण्यांत येते की , नव्याने प्रस्तावित करण्यांत आलेल्या क्षेत्राची KML copy व सर्व नकाशे परीवेशवर नव्याने upload करुन पुर्तता अहवाल अंग्लभाषेत 5 प्रतीत या कार्यालयास लवकरात लवकर सादर करणे, जेणे करुन पुढील कार्यवाही योजणे या कार्यालयाकडून शक्य होईल.

सहपत्र- वरीलप्रमाणे.

(दीपेश मल्होत्रा)
उप वनसंरक्षक
शहापूर वनविभाग, शहापूर

प्रतिलिपी:- मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) नाशिक यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, नाशिक पश्चिम यांना माहितीसाठी व उचित कार्यवहीसाठी सस्नेह आग्रेषित.
प्रतिलिपी:- वनक्षेत्रपाल डोळखांब व वाशाळा यांना माहितीसाठी व उचित कार्यवहीसाठी रवाना.
प्रतिलिपी:- सहाय्यक वनसंरक्षक (वनिकरण व वन्यजीव) शहापूर यांना माहितीसाठी व उचित कार्यवहीसाठी रवाना.
2/- प्रकल्प यंत्रणेने प्रत्सावित केलेल्या सुधारीत क्षेत्राची पाहणी करुन अहवाल सादर करावा.